REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018

# "तृणधान्य पिके :– एक भौगोलिक अभ्यास"

डॉ. अशोक शहाजी भालेराव.
भूगोल विभाग प्रमुख, चिश्तिया कला महाविद्यालय, खुलताबाद.
ता. खुलताबाद जि. औरंगाबाद (महाराष्ट्र),

## 1) सारांश :–

''विशिष्ट क्षेत्रात विशिष्ट वेळेला वेगवेगळया पिकाखाली असलेले प्रमाण म्हणजे पिक प्रारूप होय''

कृषी मध्ये प्रामुख्याने तृणधान्ये, कडधान्ये, नगदी पिके व गळीताची पिके घेतली जातात. तृणधान्यात ज्वारी, बाजरी, तांदूळ, गहू, मका, बार्ली, नाचणी इ. पिके येतात. औरंगाबाद जिल्हयामध्ये तांदूळ, बार्ली, नाचणी इ. पिकांना वातावरण अनुकूल नसल्याने या पिकांचे उत्पादन येथे आढळत नाही. जिल्हयात ज्वारी, बाजरी, मका व गहू इ. पिके मोठया प्रमाणावर घेतली जातात. जिल्हयाचे एकूण तृणधान्याखालील क्षेत्र सरासरी 313054.6 हेक्टर एवढे आहे.

## 2) प्रस्तावना :–

मानवाच्या प्राथमिक अवस्थेमध्ये मानव शिकारीवरच आपले जिवन जगत होता. कालांतराने शेतीचा शोध लागून खऱ्या अर्थाने तो स्थायिक झाला. शेतीमध्ये मानवानी वेगवेगळे प्रयोग करून शेती विकसित केलेली आहे. भारतीय कृषीत स्वातंत्र्यानंतर अन्नधान्य उत्पादनात विक्रमी वाढ झाल्याचे दिसून येते. भारताने इतर देशांना अन्नधान्याची निर्यात करण्याची क्षमता निर्माण केली आहे.

महाराष्ट्र राज्यात कृषी हा प्रमूख व्यवसाय म्हणून ओळखला जातो. राज्यात वेगवेगळी पिके घेतली जातात. येथील शेती मध्ये तृण धान्ये, कडधान्ये, नगदी पिके, गळीताची पिके इ. घेतली जातात.

तृण धान्यामध्ये प्रामुख्याने ज्वारी, तांदूळ, गहू, बाजरी, मका, बार्ली, नाचणी इ. पिके घेतली जातात. यातील काही पिके खरीप हंगामात घेतली जातात. तर काही पिके रब्बी हंगामात घेतली जातात. औरंगाबाद जिल्हयामध्ये गहू, बाजरी, ज्वारी, मका इ. पिकांचे उत्पादन झालेले आढळते. बार्ली, तांदूळ, नाचणी या पिकांचे उत्पादन झालेले आढळत नाही.

## 3) अभ्यास क्षेत्र :–

सदरील शोध निबंधा करीता औरंगाबाद जिल्हा निवडण्यात आलेला आहे. सदर जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या मध्यवर्ती भागात वसलेला आहे. मराठवाडयातील गोदावरी खोऱ्यात औरंगाबाद जिल्हा असून जिल्हयाचा अक्षांश विस्तार 19° 3′ ते 20° उ व रेखांश विस्तार 74° पू ते 76° पू. असा आहे. सदर जिल्हयामध्ये नऊ तालुके आहेत. 1) औरंगाबाद 2) फुलंब्री 3) सिल्लोड 4) सोयगांव 5) कन्नड 6) वैजापूर 7) गंगापूर 8) पैठण 9) खुलताबाद इ. तालुके येतात. जिल्हयाचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ 10100 चौ. कि.मी. आहे.









औरंगाबाद जिल्हयाच्या उत्तरेला जळगांव जिल्हा, दक्षिणेला अहमदनगर जिल्हा, पूर्वेस जालना, पश्चिमेस नाशिक जिल्हा आहे. 2011 च्या जनगणनेनुसार औरंगाबाद जिल्हयाची एकूण लोकसंख्या 3701282 इतकी असून 1924469 पुरूष व 1776813 स्त्री आहे.

**प्राकृतिक रचनेनुसार जिल्हयाचे तीन विभाग पडतात.**

1) डोंगराळ व पठारी प्रदेश
2) डोंगर पायथ्याचा प्रदेश
3) मैदानी प्रदेश

येथील जमिन सूपीक असून रेगूर मृदा आढळते. जिल्हयाचे हवामान उष्ण व कोरडे आहे.

## 4) उद्दिष्टे :–

1) तालूका निहाय तृणधान्य पिकांखालील क्षेत्र अभ्यासणे.
2) एकूण तृणधान्य पिकांखालील क्षेत्र अभ्यासणे.
3) तालूका निहाय तृणधान्य पिकांचे उत्पादन अभ्यासणे.
4) एकूण जिल्हयातील तृणधान्य पिकांचे उत्पादन अभ्यासणे.

## 5) माहीती संकलन व संशोधन पध्दती :–

सदर संशोधनाकरीता व्दितीयक माहीतीचा वापर करण्यात आलेला आहे. ही माहीती प्रकाशित व अप्रकाशित साहित्यातून घेण्यात आलेली आहे. जिल्हा जनगणना अहवाल, जिल्हा सांख्यिकीय विभाग इ. ठिकाणाहून माहीती जमा केलेली आहे. सदर माहीतीचे विश्लेषण हे विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पध्दतीने केलेले आहे. सदर माहीतीचे नकाशे, आलेख, सरासरी, टक्केवारी व्दारे विश्लेषण केले आहे. सदर संशोधनाकरीता 2010 ते 2015 या पाच वर्षाचा कालावधी निवडलेला आहे.

## 6) संशोधन विषय :–

### अ) औरंगाबाद जिल्हयातील तहसिल निहाय तृणधान्य पिका खालील क्षेत्र :–

### 1) गहू :–

**तक्ता क्र. 1** (क्षेत्र हेक्टर मध्ये)

| अ.क्र. | तहसिल | 2010-11 | 2011-12 | 2012-13 | 2013-14 | 2014-15 | एकूण सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कन्नड | 6000 | 5700 | 800 | 7939 | 8887 | 5865.2 |
| 2 | सोयगांव | 1800 | 1700 | 100 | 1516 | 1519 | 1327 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | सिल्लोड | 6200 | 4200 | 1000 | 10736 | 14365 | 7300.2 |
| 4 | फुलंब्री | 6000 | 4700 | 1000 | 5500 | 2600 | 3960 |
| 5 | औरंगाबाद | 6000 | 7000 | 800 | 8079 | 2167 | 4809.2 |
| 6 | खुलताबाद | 6600 | 2600 | 600 | 6000 | 695 | 3299 |
| 7 | वैजापूर | 8200 | 6100 | 1900 | 3876 | 1996 | 4414.4 |
| 8 | गंगापूर | 2300 | 4700 | 1500 | 4345 | 2287 | 3026.4 |
| 9 | पैठण | 4100 | 3200 | 6000 | 2962 | 2653 | 3783 |
| 10 | एकूण | 47200 | 39900 | 13700 | 50953 | 37169 | 37784.4 |

स्त्रोतः– जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल औरंगाबाद 2010–11 ते 2014–15

औरंगाबाद जिल्हयातील तहसिल निहाय गहू या तृणधान्य पिकाखालील सरासरी क्षेत्र सिल्लोड तालुक्यामध्ये सर्वाधिक 7300.2 हेक्टर एवढे असून सर्वात कमी सोयगांव तालुक्यात सरासरी क्षेत्र 1327 हेक्टर आहे.

संशोधन कालखंडामध्ये जिल्हयात सरासरी 37784.4 हेक्टर क्षेत्र गहू या पिकाखाली आढळते.

## 2) ज्वारी :–

**तक्ता क्र. 2**　(क्षेत्र हेक्टर मध्ये)

| अ.क्र. | तहसिल | 2010-11 | 2011-12 | 2012-13 | 2013-14 | 2014-15 | एकूण सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कन्नड | 2400 | 2000 | 3300 | 2413 | 1862 | 2395 |
| 2 | सोयगांव | 2800 | 2400 | 1900 | 1964 | 1742 | 2161.2 |
| 3 | सिल्लोड | 4600 | 2800 | 3900 | 1603 | 1334 | 2847.4 |
| 4 | फुलंब्री | 100 | 00 | 200 | 296 | 973 | 313.8 |
| 5 | औरंगाबाद | 15700 | 12000 | 16300 | 11440 | 8922 | 12872.4 |
| 6 | खुलताबाद | 10200 | 8500 | 5500 | 2000 | 2452 | 5730.4 |
| 7 | वैजापूर | 6600 | 10200 | 11200 | 6827 | 3965 | 7758.4 |
| 8 | गंगापूर | 20000 | 27500 | 27400 | 12000 | 9870 | 19354 |
| 9 | पैठण | 25500 | 26500 | 30200 | 17626 | 15490 | 23063.2 |
| 10 | एकूण | 87900 | 91900 | 99900 | 56169 | 46610 | 76495.8 |

स्त्रोतः– जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल औरंगाबाद 2010–11 ते 2014–15

संशोधन कालखंडात ज्वारी या पिकाखाली जिल्हयामध्ये सरासरी 76495.8 हेक्टर क्षेत्र आहे. सर्वात जास्त लागवडी खालील क्षेत्र सन 2012–13 मध्ये आढळते. तर सर्वात कमी क्षेत्र सन 2014–15 मध्ये आहे. ज्वारी या

पिकाखाली सर्वात जास्त क्षेत्र पैठण तालुक्यामध्ये सरासरी 23063.2 हेक्टर असून सर्वात कमी फुलंब्री तालुक्यात 313.8 हेक्टर आहे.

### 3) बाजरी :–

तक्ता क्र. 3 (क्षेत्र हेक्टर मध्ये)

| अ.क्र. | तहसिल | 2010-11 | 2011-12 | 2012-13 | 2013-14 | 2014-15 | एकूण सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कन्नड | 12000 | 6600 | 4000 | 3200 | 2837 | 5727.4 |
| 2 | सोयगांव | 1900 | 1700 | 1000 | 1200 | 1301 | 1420.2 |
| 3 | सिल्लोड | 11700 | 5200 | 1800 | 1700 | 2497 | 4579.4 |
| 4 | फुलंब्री | 5000 | 3900 | 2500 | 2800 | 2523 | 3344.6 |
| 5 | औरंगाबाद | 16000 | 11000 | 8500 | 8500 | 6131 | 10026.2 |
| 6 | खुलताबाद | 6000 | 7800 | 7300 | 3200 | 1412 | 5142.4 |
| 7 | वैजापूर | 11200 | 10600 | 5700 | 7900 | 6088 | 8297.6 |
| 8 | गंगापूर | 12500 | 8500 | 2400 | 3100 | 3857 | 6071.4 |
| 9 | पैठण | 13500 | 13000 | 7000 | 7900 | 5811 | 9442.2 |
| 10 | एकूण | 89800 | 68300 | 40200 | 39500 | 32457 | 54051.4 |

स्त्रोतः– जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल औरंगाबाद 2010–11 ते 2014–15

जिल्हयाचे बाजरी या पिकाखाली सरासरी 54051.4 हेक्टर क्षेत्र आहे. जिल्हयामध्ये बाजरी या पिकाचे सर्वाधिक लागवड औरंगाबाद तालुक्यात सरासरी 10026.2 हेक्टर क्षेत्र असून सर्वाधिक कमी लागवडी खालील क्षेत्र सरासरी 1420.2 हेक्टर सोयगांव तालुक्यात आढळते.

### 4) मका :–

तक्ता क्र. 4 (क्षेत्र हेक्टर मध्ये)

| अ.क्र. | तहसिल | 2010-11 | 2011-12 | 2012-13 | 2013-14 | 2014-15 | एकूण सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कन्नड | 2400 | 26200 | 27800 | 32900 | 33930 | 28966 |
| 2 | सोयगांव | 5400 | 5000 | 6400 | 7800 | 5972 | 6114.4 |
| 3 | सिल्लोड | 48200 | 52100 | 42000 | 45100 | 36812 | 44842.4 |
| 4 | फुलंब्री | 18000 | 19000 | 20500 | 6000 | 19752 | 16650.4 |
| 5 | औरंगाबाद | 9500 | 12000 | 10100 | 12700 | 9998 | 10859.6 |
| 6 | खुलताबाद | 5000 | 4500 | 3800 | 8900 | 10935 | 6627 |
| 7 | वैजापूर | 10900 | 18200 | 12000 | 23000 | 19816 | 16783.2 |
| 8 | गंगापूर | 16000 | 8500 | 6600 | 12700 | 14970 | 11754 |
| 9 | पैठण | 1400 | 1600 | 1800 | 2700 | 3130 | 2126 |
| 10 | एकूण | 138400 | 147100 | 131000 | 151800 | 155315 | 144723 |

स्त्रोतः– जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल औरंगाबाद 2010–11 ते 2014–15

मका या पिकाखाली औरंगाबाद जिल्हयात सर्वाधिक क्षेत्र सन 2014–15 मध्ये 155315 हेक्टर असून सर्वात कमी क्षेत्र सन 2012–13 मध्ये 131000 हेक्टर आढळते. अभ्यास क्षेत्रामध्ये सिल्लोड तालुक्यात सर्वाधिक

लागवडी खालील क्षेत्र असून ते 44842.4 हेक्टर आहे. व सर्वात कमी पैठण तालुक्यात सरासरी 2126 हेक्टर आहे.

## ब) जिल्हयातील तहसिल निहाय एकूण तृणधान्य पिकांखालील क्षेत्र :–

तक्ता क्र. 5 (क्षेत्र हेक्टर मध्ये)

| अ.क्र. | तहसिल | 2010-11 | 2011-12 | 2012-13 | 2013-14 | 2014-15 | एकूण सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कन्नड | 44400 | 40500 | 35900 | 46452 | 47516 | 42953.6 |
| 2 | सोयगांव | 11900 | 10800 | 9400 | 12480 | 10534 | 11022.8 |
| 3 | सिल्लोड | 70700 | 64300 | 48700 | 59139 | 55008 | 59569.4 |
| 4 | फुलंब्री | 29100 | 27600 | 24200 | 14596 | 45848 | 28268.8 |
| 5 | औरंगाबाद | 47200 | 42000 | 35700 | 40719 | 27218 | 38567.4 |
| 6 | खुलताबाद | 27800 | 23400 | 17200 | 20100 | 15494 | 20798.8 |
| 7 | वैजापूर | 36900 | 45100 | 30800 | 41603 | 31865 | 37253.6 |
| 8 | गंगापूर | 50800 | 49200 | 37900 | 32145 | 30984 | 40205.8 |
| 9 | पैठण | 44500 | 44300 | 45000 | 31188 | 27084 | 48254.4 |
| 10 | एकूण | 363300 | 347200 | 284800 | 298422 | 271551 | 313054.6 |

स्त्रोतः– संशोधकाने संग्रहीत केलेल्या अधिकृत माहीतीवर आधारीत.

औरंगाबाद जिल्हयाचे तृणधान्य पिकाखालील एकूण सरासरी क्षेत्र 313054.6 हेक्टर असून सर्वाधिक तृणधान्य पिकाखालील क्षेत्र सिल्लोड या तालुक्यात 59569.4 हेक्टर आहे. व सर्वात कमी तृणधान्य पिकांखालील क्षेत्र सोयगांव या तालुक्यात 11022.8 हेक्टर आहे. सोयगांव या तालुक्यात डोंगराळ भाग जास्त असल्यामुळे तृणधान्य पिकाखालील क्षेत्र कमी दिसून येते.

## क) जिल्हयातील एकूण तृणधान्य पिकांखालील क्षेत्र :–

तक्ता क्र. 6 (क्षेत्र हेक्टर मध्ये)

| अ.क्र. | वर्श | गहू | ज्वारी | बाजरी | मका | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2010-11 | 47200 | 87900 | 89800 | 138400 | 363300 |
| 2 | 2011-12 | 39900 | 91900 | 68300 | 147100 | 347200 |
| 3 | 2012-13 | 13700 | 99900 | 40200 | 131000 | 284800 |
| 4 | 2013-14 | 50953 | 56169 | 39500 | 151800 | 298422 |
| 5 | 2014-15 | 37169 | 46610 | 32457 | 155315 | 271551 |
| 6 | एकूण सरासरी | 37784.4 | 76495.8 | 54051.4 | 144723 | 313054.6 |

स्त्रोतः– संशोधकाने संग्रहीत केलेल्या अधिकृत माहीतीवर आधारीत.




जिल्हयातील तृणधान्य पिकामध्ये ज्वारी या पिकाखाली सर्वात जास्त क्षेत्र आढळते. तृणधान्य पिकांचे क्षेत्र सन 2010–11 मध्ये 363300 हेक्टर आहे. तर 2011–12, 2012–13, 2013–14, व 2014–15 मध्ये अनुक्रमे 347200, 284800, 298422 व 271551 हेक्टर क्षेत्र आहे.

जिल्हाचे तृणधान्य या पिकाखाली संशोधन कालखंडात सरासरी 313054.6 हेक्टर क्षेत्र आढळते.

## ड) औरंगाबाद जिल्हयातील धान्य पिके यांचे उत्पादन :–

### 1) गहू :–

तक्ता क्र. 7 (उत्पादन मे. टनामध्ये)

| अ.क्र. | तहसिल | 2010-11 | 2011-12 | 2012-13 | 2013-14 | 2014-15 | एकूण सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कन्नड | 151.41 | 12945 | 1120 | 14171 | 7919 | 7261.28 |
| 2 | सोयगांव | 114.19 | 2596 | 85 | 1520 | 1974 | 1257.83 |
| 3 | सिल्लोड | 64.11 | 7959 | 729 | 12207 | 17116 | 7615.02 |
| 4 | फुलंब्री | 114.75 | 8051 | 729 | 12452 | 3696 | 5008.55 |
| 5 | औरंगाबाद | 256.82 | 13041 | 832 | 14849 | 2333 | 6262.36 |
| 6 | खुलताबाद | 261.49 | 4238 | 594 | 10444 | 526 | 3212.70 |
| 7 | वैजापूर | 184.62 | 11773 | 1414 | 7031 | 2035 | 4487.52 |
| 8 | गंगापूर | 184.30 | 8785 | 1357 | 7243 | 2327 | 3979.26 |
| 9 | पैठण | 159.18 | 5245 | 5556 | 2903 | 3281 | 3428.84 |
| 10 | एकूण | 1490.87 | 74633 | 12416 | 82820 | 41207 | 42513.37 |

स्त्रोतः– जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल औरंगाबाद 2010–11 ते 2014–15

औरंगाबाद जिल्हयातील गहू या पिकांचे इ.स. 2010–11 ते 2014–15 या कालावधीतील एकूण सरसरी उत्पादन 42513.37 मे.टन झालेले आहे. तर सर्वाधीक उत्पादन सिल्लोड तालुक्यात 7615.02 मे.टन झालेले असून सर्वात कमी सोयगांव तालुक्यात सरासरी 1257.83 मे.टन उत्पादन झालेले आहे.

### 2) ज्वारी :–

तक्ता क्र. 8 (उत्पादन मे.टनामध्ये)

| अ.क्र. | तहसिल | 2010-11 | 2011-12 | 2012-13 | 2013-14 | 2014-15 | एकूण सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कन्नड | 106.04 | 2056 | 4621 | 1764 | 990 | 1907.4 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | सोयगांव | 52.47 | 4594 | 1820 | 189 | 1550 | 1641.10 |
| 3 | सिल्लोड | 96.54 | 8055 | 1884 | 450 | 75 | 2112.11 |
| 4 | फुलंब्री | 195.74 | 12 | 40 | 231 | 219 | 139.55 |
| 5 | औरंगाबाद | 136.32 | 10704 | 2934 | 7150 | 4781 | 5141.06 |
| 6 | खुलताबाद | 12.49 | 5780 | 2211 | 1600 | 601 | 2040.89 |
| 7 | वैजापूर | 7.22 | 5885 | 2632 | 5564 | 1381 | 3093.84 |
| 8 | गंगापूर | 54.38 | 21175 | 4384 | 9420 | 2816 | 7569.87 |
| 9 | पैठण | 121.22 | 21412 | 6321 | 13748 | 11828 | 10686.04 |
| 10 | एकूण | 782.42 | 79673 | 26847 | 40116 | 24241 | 34331.82 |

स्त्रोतः– जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल औरंगाबाद 2010–11 ते 2014–15

सन 2010–11 ते 2014–15 या कालावधीतील औरंगाबाद जिल्हयातील ज्वारी या पिकांचे एकूण सरासरी उत्पादन 34331.82 मे.टन आहे. तर औरंगाबाद जिल्हयातील सर्वात जास्त ज्वारी पिकांचे सरासरी उत्पादन पैठण तालुक्यात सरासरी 10686.04 मे.टन तर सर्वात कमी उत्पादन फुलंब्री तालुक्यात 139.55 मे.टन झाले आहे. औरंगाबाद तालुक्यात 5141.06 मे.टन, वैजापूर तालुक्यात 3093.84 मे.टन, गंगापूर तालुक्यात 7569.87 मे.टन उत्पादन झालेले आहे.

## 2) बाजरी :–

**तक्ता क्र. 9** (उत्पादन मे.टनामध्ये)

| अ.क्र. | तहसिल | 2010-11 | 2011-12 | 2012-13 | 2013-14 | 2014-15 | एकूण सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कन्नड | 165.48 | 8756 | 22868 | 4339 | 2324 | 7690.50 |
| 2 | सोयगांव | 25.12 | 2164 | 1005 | 1433 | 532 | 1031.82 |
| 3 | सिल्लोड | 176.20 | 5656 | 1074 | 2096 | 790 | 1958.44 |
| 4 | फुलंब्री | 67.70 | 4584 | 2185 | 3968 | 2273 | 2615.54 |
| 5 | औरंगाबाद | 257.82 | 14373 | 4420 | 11135 | 3266 | 6690.36 |
| 6 | खुलताबाद | 76.22 | 15948 | 5789 | 2963 | 902 | 5135.65 |
| 7 | वैजापूर | 180.26 | 13042 | 3848 | 12482 | 2821 | 6474.65 |
| 8 | गंगापूर | 158.99 | 10137 | 763 | 3348 | 984 | 3078.20 |
| 9 | पैठण | 138.86 | 15948 | 5817 | 8097 | 3854 | 6770.97 |
| 10 | एकूण | 1246.65 | 90608 | 47769 | 49861 | 17746 | 41446.13 |

स्त्रोतः– जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल औरंगाबाद 2010–11 ते 2014–15

बाजरी या पिकाचे औरंगाबाद जिल्हयातील संशोधन काळामध्ये सरासरी 41446.13 मे.टन उत्पादन झालेले आहे. संशोधन कालखंडात सर्वात जास्त उत्पादन कन्नड तालुक्यामध्ये 7690.50 मे. टन झालेले असून सर्वात कमी सोयगांव तालुक्यात 1031.82 मे. टन झालेले आहे.

## 2) मका :–

**तक्ता क्र. 10** (उत्पादन मे.टनामध्ये)

| अ.क्र. | तहसिल | 2010-11 | 2011-12 | 2012-13 | 2013-14 | 2014-15 | एकूण सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कन्नड | 916.01 | 8127 | 79869 | 207632 | 41431 | 67595 |
| 2 | सोयगांव | 200.03 | 17500 | 12601 | 21388 | 4425 | 11222.81 |
| 3 | सिल्लोड | 1745.13 | 154388 | 84630 | 230957 | 37465 | 101837 |
| 4 | फुलंब्री | 541.04 | 58900 | 39872 | 69888 | 25599 | 38960.01 |
| 5 | औरंगाबाद | 63.54 | 49764 | 16755 | 51854 | 8131 | 25313.51 |
| 6 | खुलताबाद | 228.13 | 21733 | 8994 | 24030 | 8129 | 12622.83 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 7 | वैजापूर | 503.04 | 81581 | 36528 | 90551 | 20554 | 45943.41 |
| 8 | गंगापूर | 524.08 | 21177 | 4996 | 50482 | 8756 | 17187.02 |
| 9 | पैठण | 29.96 | 4240 | 2977 | 16073 | 1627 | 4989.392 |
| 10 | एकूण | 4750.96 | 417410 | 287222 | 762855 | 156117 | 325671 |

स्त्रोतः– जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल औरंगाबाद 2010–11 ते 2014–15

सन 2010–11 ते 2014–15 या संशोधन काळामध्ये मका या पिकांचे उत्पादन जिल्हयामध्ये सरासरी 325671 मे. टन झालेले आहे.

जिल्हयामधील सिल्लोड तालुक्यामध्ये मकाचे उत्पादन सर्वाधिक सरासरी 101837 मे. टन असून सर्वात कमी पैठण तालुक्यामध्ये सरासरी 4989.39 मे.टन झालेले आहे.

## इ) जिल्हयातील तहसिल निहाय एकूण तृणधान्य उत्पादन :–

**तक्ता क्र. 11** (उत्पादन मे.टनामध्ये)

| अ.क्र. | तहसिल | 2010-11 | 2011-12 | 2012-13 | 2013-14 | 2014-15 | एकूण सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कन्नड | 1338.94 | 31884 | 108478 | 227906 | 52664 | 84454.18 |
| 2 | सोयगांव | 391.81 | 26854 | 15511 | 24530 | 8481 | 15153.53 |
| 3 | सिल्लोड | 2081.98 | 176058 | 88317 | 245710 | 55446 | 113522.59 |
| 4 | फुलंब्री | 919.23 | 71547 | 42826 | 86539 | 31787 | 46723.30 |
| 5 | औरंगाबाद | 714.50 | 87882 | 24941 | 84988 | 18513 | 43407.7 |
| 6 | खुलताबाद | 578.33 | 47699 | 17588 | 39037 | 10158 | 23012.06 |
| 7 | वैजापूर | 875.14 | 112281 | 44422 | 115628 | 26791 | 59999.43 |
| 8 | गंगापूर | 921.75 | 61274 | 11500 | 70493 | 14883 | 31814.35 |
| 9 | पैठण | 449.22 | 46845 | 20671 | 40821 | 20590 | 25875.24 |
| 10 | एकूण | 8270.9 | 662324 | 374254 | 935652 | 239311 | 443962.38 |

स्त्रोतः– जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल औरंगाबाद 2010–11 ते 2014–15

संशोधन काळामध्ये अभ्यास क्षेत्रात तृणधान्याचे एकूण उत्पादन सरासरी 443962.38 मे. टन झालेले आहे. त्याच प्रमाणे सिल्लोड तालुक्यामध्ये धान्याचे उत्पादन सर्वात जास्त सरासरी 113522.59 मे. टन झालेले आहे. व सर्वात कमी उत्पादन सोयगांव तालुक्यात सरासरी 15153.53 मे.टन झालेले आहे.

## ई) जिल्हयातील एकूण तृणधान्य उत्पादन :–

**तक्ता क्र. 11** (उत्पादन मे.टनामध्ये)

| अ.क्र. | वर्ष | गहू | ज्वारी | बाजरी | मका | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2010.11 | 1490.87 | 782.42 | 1246.65 | 4750.96 | 8270.9 |
| 2 | 2011.12 | 74633 | 79673 | 90608 | 417410 | 662324 |
| 3 | 2012.13 | 12416 | 26847 | 47769 | 287222 | 374250 |
| 4 | 2013.14 | 82820 | 40116 | 49861 | 762855 | 935652 |
| 5 | 2014.15 | 41207 | 24241 | 17746 | 156117 | 239311 |
| 6 | एकूण सरासरी | 42513.37 | 34331.88 | 41446.13 | 325671 | 443962.38 |

स्त्रोतः– संशोधकाने संग्रहीत केलेल्या अधिकृत माहीतीवर आधारीत.




जिल्हयामध्ये संशोधन कालखंडात सर्वात जास्त उत्पादन गहू या पिकाचे सरासरी 42513.37 मे. टन झालेले आहे. व सर्वात कमी ज्वारीचे उत्पादन सरासरी 34331.88 मे.टन झालेले आहे. सन 2010–11 मध्ये तृणधान्याचे उत्पादन सरासरी 8270.9 मे.टन झालेले आहे. त्याच प्रमाणे सन 2013–14 मध्ये एकूण धान्याचे उत्पादन 935652 मे. टन झालेले आहे.

## 7) निष्कर्ष :–

1) गहू या पिकाखाली संशोधन काळात सरासरी 37784.4 हेक्टर क्षेत्र आहे.
2) अभ्यास क्षेत्रात ज्वारी या पिकाचे लागवडी खालील क्षेत्र सरासरी 76495.8 हेक्टर आहे.
3) बाजरी या पिकांचे जिल्हयात सरासरी 54051.4 हेक्टर क्षेत्र लागवडी खाली असून मका या पिकाचे 144723 हेक्टर क्षेत्र लागवडी खाली आहे.
4) जिल्हयाचे तृणधान्य या पिकाखाली संशोधन कालखंडात सरासरी 313054.6 हेक्टर क्षेत्र लागवडी खाली आहे.
5) जिल्हयामध्ये संशोधन काळात गहू या पिकाचे उत्पादन सरासरी 42513.37 मे. टन झालेले आहे.
6) ज्वारी या पिकाचे उत्पादन सरासरी 34331.82 मे. टन झालेले असून बाजरीचे उत्पादन सरासरी 41446.13 मे. टन झालेले आहे.
7) संशोधन कालखंडात जिल्हयात मका पिकांचे उत्पादन सरासरी 325671 मे. टन झालेले आहे.
8) संशोधन कालखंडामध्ये अभ्यास क्षेत्रात तृणधान्याचे उत्पादन सरासरी 443962.38 मे. टन झालेले आहे.

## 8) संदर्भ सूची :–

1) जिल्हा सांख्यिकिय कार्यालय औरंगाबाद.
2) जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन अहवाल औरंगाबाद 2010–11.
3) जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन अहवाल औरंगाबाद 2011–12.
4) जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन अहवाल औरंगाबाद 2012–13.
5) जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन अहवाल औरंगाबाद 2013–14.
6) जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन अहवाल औरंगाबाद 2014–15.
7) जिल्हा जनगणना अहवाल 2011.

8) कृषी भूगोल – डॉ. सुरेश फुले.
9) महाराष्ट्राचा भूगोल – डॉ. सुरेश फुले.
10) कृषी तंत्रज्ञानाचा भौगोलिक अभ्यास – डॉ. सचिन खरात.
11) वार्षिकी 2011– महाराष्ट्र : संपादक :– तुकाराम जाधव



**डॉ. अशोक शहाजी भालेराव.**
**भूगोल विभाग प्रमुख, चिश्तिया कला महाविद्यालय, खुलताबाद. ता. खुलताबाद जि. औरंगाबाद (महाराष्ट्र),**